NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक २३.१०.२०२६ शुक्रवार

(कामगिरी)

१) कुख्यात गुंड स्थानबध्द :–

नागपूर शहराचे पोलीस आयुक्त यांनी पोलीस ठाणे कळमना, यशोधरानगर, पाचपावली व हुडकेश्वर नागपूर शहराचे हद्दीत शरीराविरूध्द गुन्हे करणारा कुख्यात गुंड नामे साहील शाह वल्द सलाम शाह, वय २७ वर्षे, रा. वनदेवीनगर झोपडपटट्री, यशोधरानगर, नागपूर यास ''महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हीडीयो पायरेटस्, वाळु तस्कर, अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणारे, बेकायदेशिर जुगार, बेकायदेशिर लॉटरी चालविण्याचा आणि मानवी अपव्यापार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणे संबंधी अधिनियम, १९८१'' अन्वये स्थानबध्द आदेश पारीत केला. नमुद आदेशाची दि. २२.१०.२०२६ रोजी बजावणी करून, त्यास छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह, हर्सूल येथे ठेवण्यात आले आहे.

साहील शाह वल्द सलाम शाह याचेविरूध्द पोलीस ठाणे कळमना, यशोधरानगर, पाचपावली व हुडकेश्वर येथे गैरकायद्याची मंडळी जमवुन खुनाचा प्रयत्न करणे, प्राणघातक शस्त्राने आपखुशीने गंभीर दुखापत करणे, आपखुशीने दुखापत करणे, शांतता भंग करण्याच्या उद्देशाने जाणीवपुर्वक अपमान करणे, दरोडा घालतांना आपखुशीने दुखापत करणे, मृत्यु किंवा गंभीर दुखापत करण्याच्या प्रयत्नासहित जबरी चोरी करणे, चोरटे गृह–अतिक्रमण करतांना गंभीर दुखापत करणे, दुखापत, हमला किंवा गैरनिरोध करण्याची पुर्वतयारी करून नंतर गृह–अतिक्रमण करणे, फौजदारीपात्र कट रचणे, जीवे ठार मारण्याची धमकी देणे, अश्लिल भाषेत शिवीगाळी करणे, मालमत्तेचे नुकसान करणे, मादक पदार्थांची विक्री करणे आणि बाळगणे, प्राणघातक शस्त्र जवळ बाळगणे, मनाई आदेशाचे उल्लंघन करणे, इत्यादी मालमत्ता आणि ारीराविरूध्दचे गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत.

नमुद स्थानबध्द इसमाविरूध्द गुन्हेगारी कृत्यापासून परावृत्त करण्यासाठी पोलीस ठाणे यशोधरानगर पोलीसांकडून सन २०२१ व २०२२ मध्ये कलम ११० (ई)(ग) सी.आर.पी.सी. अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर सन २०२५ मध्ये १२९ (ई)(ग) बी.एन.एस.एस. अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. त्याचेकडुन तीन वर्षाकरीता अंतिम बंधपत्र घेण्यात आले होते. सदर बंधपत्राचे उल्लंघन करून, त्याने अलीकडील काळात पोलीस ठाणे यशोधरानगर हदद्ीत दुखापत, हमला किंवा गैरनिरोध करण्याची पुर्वतयारी करून नंतर गृह–अतिक्रमण करणे, आपखुशीने दुखापत करणे, अपराधीक जिवे मारण्याची धमकी देणे, अश्लील भाषेत शिवीगाळी करणे इत्यादी गंभीर स्वरूपाचे गुन्हे केलेले आहेत.

अशाप्रकारे धोकादायक व्यक्ती नामे साहील शाह वल्द सलाम शाह याची अपराधीक कृत्ये निरंतर वाढत असल्याने आणि त्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण होत असल्याने वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पोलीस ठाणे यशोधरानगर यांनी नमुद आरोपीतास स्थानबध्द करण्याकरिता गुन्हेशाखेस प्रस्ताव सादर केला होता.

गुन्हेशाखेतील एम.पी.डी.ए. विभागाने नमुद आरोपीला स्थानबध्द करण्याकरीता प्रस्ताव सादर केला. त्याअन्वये स्थानबध्द प्राधिकारी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे समक्ष सादर केले असता, त्यांनी वर नमुद स्थानबध्द इसमाविरूध्द स्थानबध्दतेचा आदेश पारीत करून, त्यास छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह, हर्सूल येथे ठेवण्याबाबत आदेश दिलेत. त्याअन्वये वर नमुद इसमाविरूध्द स्थानबध्दतेची महत्वपुर्ण कारवाई करून, त्यास छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह, हर्सूल येथे ठेवण्यात आले आहे.

२) कुख्यात गुंड हद्दपार :–

पोलीस ठाणे अजनी हददीत, **अजनी रेल्वे क्वॉर्टर क्र. २/३६३, नागपूर येथे राहणारा कुख्यात गुन्हेगार ईसम नामे युगल पुरुषोत्तम नारखेडे, वय २७ वर्षे** याचेविरूध्द पोलीस ठाणे अजनी, हुडकेश्वर व सक्करदरा येथे गंभीर दुखापत करणे, अवैध अंमली पदार्थांची विक्री करणे, प्राणघातक शस्त्र बाळगणे, शिवीगाळ व मारपिट करणे ईत्यादी गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता अजनी पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४ नागपुर शहर याचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. २२/२०२६ दिनांक २१.१०.२०२६ अन्वये गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला. नमुद गुन्हेगाराचे हद्दपार आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली असुन, अजनी पोलीसांनी नमुद हद्दपार इसमास त्याचे नातेवाईकाकडे जि. जळगाव येथे सोडलेले आहे. खालील छायाचित्रातील हद्दपार ईसम नागपुर शहरात आढळुन आल्यास पो. ठाणे अजनी अथवा डायल ११२ वर कळवावे.



युगल

३) कपीलनगर पोलीसांची कामगिरी :– वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक. एकुण ०९ गुन्हे उघडकीस, ६,३०,०००/–रू. चा मुद्देमाल हस्तगत.

दिनांक १५.१०.२०२६ चे १६.०० वा. ते १७.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी प्रतिक पांडुरंग शापामोहन, वय ३३ वर्षे रा. प्लॉट क्र. १६४, निर्मल नगर, गोरेवाडा, गिट्टीखदान, नागपूर यांनी त्यांची ॲक्टिवा ५$^{जी}$ मोपेड क्र. एम.एच ३१ जी.बी ६११४ किंमती ३०,०००/–रू. ची पोलीस ठाणे कपिलनगर हद्दीत सुगतनगर बुध्द विहाराजवळील सार्वजनिक रोडवरील त्यांचे पावभाजीचे दुकानासमोर लॉक करून, पार्क करून, दुकानदारी करणेकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद दुचाकी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कपिलनगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्ह्याचा पाठपुरावा करतांना, कपिलनगर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत आरोपीचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असता, त्यांना एक ॲक्टिवा डिएलएक्स मोपेड क्र. एम.एच ३१ जी.ई ८७८० वर एक इसम संशयीतरित्या फिरतांना दिसुन आल्याने, त्यास थांववुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव विहंग सचिन पाटील, वय १८ वर्षे, रा. प्लॉट क्र. ५६५, मॉडेल टाऊन, सारीपुत्र बुध्द

विहारजवळ, इंदोरा चौक, जरीपटका, नागपुर असे सांगितले. त्यास त्याचे ताब्यातील वाहनासंबंधी कागदपत्रे विचारली असता, त्याने कोणतेही कागदपत्र सादर न करता उडवा–उडवीची उत्तरे दिली. त्यास वाहनासह पोलीस ठाणे येथे आणुन वाहनासंबंधी तपास केला असता, नमुद वाहन हे पोलीस ठाणे मानकापुर येथे दाखल वाहनचोरीचे गुन्ह्यातील असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीस अधिक सखोल विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहनचोरीचा गुन्हा केल्याचे कबुल करुन, या गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत एक वाहनचोरी, सक्करदरा हद्दीत एक वाहनचोरी, मानकापुर हद्दीत तीन वाहनचोरी आणि अंबाझरी हद्दीत तीन वाहनचोरी असे एकुण ०९ वाहनचोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन, १) ॲक्टिवा मोपेड क्र. एम.एच ३१ जी.बी ६११४ २) ॲक्टिवा क्र. एम.एच ४९ बी.एन ९२४७ ३) बुलेट ३५० क्लासीक गाडी क्र. एम.एच ४९ बी.एच ९२२४ ४) ॲक्टिवा मोपेड क्र. एम.एच ३१ जी.ई ८७८० ५) ॲक्टिवा क्र. एम.एच ४० बी.वाय ८७४९ ६) ऐविएटर गाडी क्र. एम.एच ३१ सी.वाय ९९४० ७) स्प्लेंडर मोटारसायकल क्र. एम.एच ३१ जी.एच २१७३ ८) ॲक्टिवा क्र. एम.एच ४० ए.एस ३६८१ तसेच, ९) विनानंबरची हिरो डिलक्स दुचाकी अशी एकूण ०९ वाहने किंमती अं. ६,३०,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ६), मा. श्री. सत्यवीर बंडीवार, सहा. पोलीस आयुक्त (जरीपटका विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. सतिश आडे, पोउपनि. प्रशांत राऊत, पोहवा. शहजाद शेख, सुरेश मिश्रा, पोअं. चंद्रशेखर डोंगरे, निलेश पवार, रितेश वर्मा, सागर बघेल, मुकेश हलमारे, विवेक सावरकर यांनी परिमंडळ क्र. ६ येथील सायबरचे पोअं. सचिन सांगोले यांचे मदतीने केली.



<u>४) नवीन कामठी पोलीसांची कामगीरी :– घरफोडीचा गुन्हा उघडकीस.</u>

दिनांक १६.०९.२०२६ चे १४.०० वा. ते १८.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत, कामठी रोडवरील मोक्षधाम जवळील काली माता मंदीरचे आत, कोणीतरी अज्ञात चोरट्याने प्रवेश करुन, देविचे डोक्यावरील चांदीचा मुकुट वजनी ५५ ते ६० ग्राम किंमती अं. २०,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला. अशा फिर्यादी नामे सन्नी सिध्दार्थ चव्हान, वय ३० वर्षे, रा. कोळसाटाल, मस्जिद जवळ, कामठी, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नवीन कामठी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(ड),३३१(३) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान नवीन कामठी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपीस निष्पन्न करुन आरोपी नामे धनराज नारायणस्वामी पिल्ले, वय ३१ वर्षे, रा. सैलाबनगर, झेंड्याजवळ, नवीन कामठी, नागपुर यास ताब्यात घेऊन गुन्ह्यासंबंधाने विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन गुन्ह्यातील चोरी गेलेला संपुर्ण मुद्येमाल किंमती २०,०००/—रू. चा जप्त करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहू, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), मा. श्री. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. अंकुश खेडकर, सहा. पोलीस आयुक्त (कामठी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्री. महेश आंधळे, पोउपनि. योगेश नाल्टे, सफौ. किशोर महंत, पोअं. विवेक दोरसेटवार, सुरज ठाकुर, आशिष बागडे व तुषार मोरे यांनी केली.



(गुन्हे)

१) पोलीस ठाणे खापरखेडा :— हद्दपार ईसमास अटक.

दिनांक २२.१०.२०२६ चे २२.०० वा. ते २२.४० वा. चे दरम्यान, खापरखेडा पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, रेकॉर्डवरील गुन्हेगार व हद्दपार इसम अक्षय भोस्कर हा मौजा नांदा, विसर्जन पॉईन्ट जवळील मातोश्री बियर बार येथे आला आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, पंचासमक्ष नमुद ठिकाणी गेले असता, तेथे बारमध्ये प्राप्त वर्णनाचा इसम मिळून आला. त्यास ताब्यात घेऊन, त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव अक्षय उर्फ डग्गम पुरुषोत्तम भोस्कर, वय ३० वर्षे, रा. वार्ड क्र. २, श्याम मंगल कार्यालय जवळ, खापरखेडा, नागपुर असे सांगितले. त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०६ यांचे हद्दपार आदेश क्र. १३/२०२६ दिनांक ०२.०९.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपीचे ताब्यातुन एक विनानंबरची होंडा अक्टिवा किंमती ३०,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोअं. शेखर वानखेडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे खापरखेडा येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे गणेशपेठ :—शस्त्र बाळणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक २३.१०.२०२६ चे ०६.२० वा. चे सुमारास, गणेशपेठ पोलीसांचे बिट मार्शल हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, कल्पना वाईन शॉप मागे एक काळ्या रंगाची टि—शर्ट घातलेला इसम शस्त्र घेऊन वावरत आहे. अशा माहीतीवरून नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा

ईसम निळी पिशवी घेवुन संशयास्पद स्थितीत वावरतांना दिसुन आला. त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळून जाण्याचे तयारीत असता, त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मोहम्मद फैजान वकील अन्सारी, वय ४२ वर्षे, रा. मोमीनपुरा कब्रस्तान रोड, कामील अन्सारीचे घराजवळ, तहसील, नागपुर असे सांगीतले. त्याचेजवळील निळ्या रंगाचे पिशवीची पाहणी केली असता, त्यामध्ये काळी मुठ असलेली एक स्टीलची टोकदार गुप्ती किंमती ५००/– रू. ची मिळुन आल्याने जप्त करण्यात आली.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने स्टीलची गुप्ती बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोअं. सागर धवन यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे सफौ. समिर शेख यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

(मिसींग)

१) पोलीस ठाणे गणेशपेठ :– फिर्यादी जाकीर अहमद मोहम्मद गौस, वय ३९ वर्षे, रा. गणेशपेठ, मॉडेल मिल चाळ क्र. १२, नागपूर यांनी पोलीस ठाणे गणेशपेठ येथे तक्रार दिली की, त्यांचे भाऊजी नामे सैयद अजिम अली अहमद, वय ५४ वर्षे, रा. देसाईगंज वडसा, कमलानगर, मदिना मस्जिदजवळ, गडचिरोली हे दिनांक ११.०८.२०२६ चे ११.०० वा. पासुन पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीतील बसस्थानक परिसर येथून बेपत्ता झाले आहेत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आले नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे गणेशपेठ येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन–** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–मध्यम, उंची–५ फुट ४ इंच, डोळे–काळे, केस–काळे, अंगात– ग्रे रंगाचा फुलबाहीचा शर्ट व नेव्ही ब्ल्यु रंगाचा पॅन्ट, काळी चप्पल घातलेली आहे. भाषा– हिंदी बोलतात.

२) पोलीस ठाणे जरीपटका :– फिर्यादी श्रीमती शोभा धिरज अडकने, वय ४७ वर्षे, रा. मिसाळ ले–आऊट, विजय वासनिक यांचे घरी किरायाने, इंदोरा, नागपूर यांनी पोलीस ठाणे जरीपटका येथे तक्रार दिली की, त्यांची मुलगी नामे कु. अंतरा धिरज अडकने, वय १९ वर्षे ही दिनांक १५.१०.२०२६ चे २०.०० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका येथील राहते घरुन बेपत्ता झाली आहे. शोध घेतला असता, मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने तिला फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे जरीपटका येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन–** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–सडपातळ, उंची–४ फुट, अंगात–गडद लाल रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलते.

३) पोलीस ठाणे पाचपावली :– फिर्यादी विनोद कृष्णराव नंदनवार, वय ५८ वर्षे, रा. तांडापेठ, गोमा वस्ताद आखाडा जवळ, जुनी वस्ती, प्रकाश पानठेल्याजवळ, पाचपावली, नागपूर यांनी पोलीस ठाणे पाचपावली येथे तक्रार दिली की, त्यांचे वडील नामे कृष्णराव झोलबाजी नंदनवार, वय ७५ वर्षे हे दिनांक २२.०८.२०२६ चे १७.०० वा. पासुन पोलीस ठाणे पाचपावली हद्दीतील राहते घरून बेपत्ता झाले आहेत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आले नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे पाचपावली येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १३८, १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन–** रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट ४ इंच, डोळे–काळे, केस–पांढरे व समोरून टक्कल पडलेले, अंगात– ग्रे रंगाचा शर्ट व ग्रे रंगाचा लोवर, पायात काळी चप्पल घातलेली आहे. भाषा– कोष्ठी, मराठी, हिंदी बोलतात.


सैयद अजिम


कु. अंतरा


कृष्णराव

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.

वाहतुक शाखेची प्रेसनोट

नागपूर शहरातील बहुतेक वाहन चालक हे आपली वाहने सार्वजनीक रस्त्याच्या फुटपाथवर व मुख्य मार्गावर वाहने पार्क करतात तसेच, काही हॉकर्स हे आपली अस्थाई आस्थापने फुटपाथवर लावुन व्यवसाय करतात. या आस्थापनेमध्ये येणारे ग्राहकसुद्धा आपली वाहने फुटपाथवर किंवा फुटपाथलगत पार्क करतात. काही आस्थापनांनी फुटपाथची तोडफोड करून, अवैध बांधकाम केलेले आहे. त्यामुळे पायी चालणाऱ्या पादचाऱ्यांना फुटपाथ मोकळा नसल्याने बरेच पादचारी (Pedestrians) हे नाईलाजास्तव मुख्य रस्त्याचा वापर करतात. त्यामुळे गंभीर अपघात घडतात.

अशा घटनांना वेळीच आळा घालने आवश्यक असल्याने, नागपुर शहर वाहतुक पोलीस विभागाचे वतीने फुटपाथवरील अवैधरित्या पार्क केलेल्या वाहनांवर मोटार वाहन कायद्याचे कलम १२२, १७७ प्रमाणे टोईंग वाहनाद्वारे तसेच, फुटपाथवरील अस्थाई आस्थापना यांचेवर महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १०२, ११७ प्रमाणे कारवाई करण्यात येत आहे.

काही आस्थापना चालकांनी फुटपाथची तोडफोड करून अवैध बांधकाम केलेले असल्याने यापुढे विशेष मोहीम राबवुन त्यांचेविरूध्द म.न.पा.चे मदतीने अधिक प्रभावीपणे कारवाई करून, कलम ३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायदा–१९८४ अन्वये गुन्हे नोंद करण्यात येईल .

सर्व नागरीकांना याव्दारे आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपली वाहने फुटपाथवर पार्क न करता पार्कीगचे ठिकाणीच पार्क करावी. तसेच, अस्थाई आस्थापना चालक (हॉकर्स) यांनी फुटपाथ व सार्वजनीक रस्त्यावर किंवा रस्त्याचे कडेला वाहतुकीस अडथळ निर्माण होईल अशाप्रकारे आपली अस्थापने लावू नयेत व त्यांच्या आस्थापनेत येणाऱ्या ग्राहकांना आपली वाहने पार्कीगचे ठिकाणीच पार्क करण्याच्या सुचना देतील. त्याचप्रमाणे कोणतेही आस्थापना चालक फुटपाथची तोडफोड करून त्यावर अतिरिक्त बांधकाम करणार नाही.

नागरीकांनी आपले व ईतरांचे सुरक्षीततेच्या दृष्टीने सर्व वाहतुक नियमांचे पालन करून, वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे.

स्वा/–
(आदित्य मिरखेलकर, भापोसे)
पोलीस उप आयुक्त, वाहतुक,
नागपूर शहर.